# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 16 June 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १६ जून २०२४ दुपारी १.०० वा.

****

मुंबईत सुरू असलेल्या अठराव्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव `मिफ` मध्ये आज पहिल्या `डॉक फिल्म बाजार`चं उद्धघाटन प्रसिद्ध निर्माते अपूर्व बक्षी यांच्या हस्ते झालं. नवोदित माहितीपट निर्मात्यांना आर्थिक सहाय्य प्रदान करणं आणि संभाव्य निर्मात्यांना त्यांचं कार्य प्रदर्शित करण्यासाठी व्यासपीठ देणं हे `डॉक फिल्म बाजार`चं उद्दिष्ट आहे. उद्घाटनाच्या कार्यक्रमानंतर सर्व मान्यवरांनी या `डॉक फिल्म बझार`मध्ये सहभागी विविध देश आणि संस्थांच्या दालनांना भेट देत त्यांच्याशी संवाद साधला.

****

भारतीय रेल्वेची लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. विविध सार्वजनिक सेवा कार्यक्रमात अधिकाधिक लोकांच्या सहभागाबद्दल ही नोंद झाली आहे. रेल्वेतर्फे २६ फेब्रुवारी रोजी विविध दोन हजार स्थळांवर कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. त्यामध्ये ४० लाख, १९ हजार लोकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते, रेल्वे पूल, रस्त्यांचं उद्धघाटन, नव्या रेल्वेस्थानकांची पायाभरणीही झाली होती.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या ३० जून रोजी रविवारी अकरा वाजता `मन की बात` कार्यक्रमात जनतेशी संवाद साधतील. आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरुन हा कार्यक्रम प्रसारित होणार आहे. या कार्यक्रमाचा हा एकशे अकरावा भाग असेल. सलग

तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतरचा त्यांचा हा पहिलाच मन की बात कार्यक्रम असेल.

****

लातूर जिल्ह्यातील इयत्ता दहावी, बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक दाखले –प्रमाणपत्रं त्यांच्या जवळच्या परिसरात उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. त्यासाठी येत्या १८ जून ते दोन जुलैदरम्यान महाराजस्व अभियान राबवलं जाणार आहे. लातूर तालुक्यात या कालावधीत ६६ महा ई–सेवा केंद्रांद्वारे लातूरच्या दहा शाळा, अन्य आठ महसूल मंडळात होणाऱ्या शिबिरांतून दहा हजार प्रमाणपत्रं वितरणाचं प्रशासनाचं उद्दीष्ट आहे.

****

शेगावहून पंढरपूरला निघालेली श्री संत गजानन महाराजांची पालखी आज दुसऱ्या दिवशीही अकोल्यात मुक्कामी आहे. शहरात दिवसभर पालखीची परिक्रमा सुरु असून हजारो भाविकांची दर्शनासाठी रिघ लागली आहे. उद्या ही पालखी वाशिमकडं प्रस्थान करणार आहे. दरम्यान, काल अकोल्यात या पालखीचं आगमन झालं असून कालही मध्यरात्रीपर्यंत असंख्य भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

****

सांगली जिल्ह्याच्या मिरज तालुक्यातल्या सावळी इथल्या शाळेतील विद्यार्थ्यांना काल पालकमंत्री डॉक्टर सुरेश खाडे, खासदार विशाल पाटील यांच्या हस्ते मोफत गणवेशाचं वाटप झालं. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील पहिली ते आठवीच्या सर्व मुली, अनुसूचित जाती–जमातीसह दारिद्र्य रेषेखालील मुलांना याचा लाभ झाला आहे.

दरम्यान, गणवेश तयार करण्याचं काम स्थानिक महिला बचत गटांनी केल. त्यामुळे या बचतगटांनाही अर्थसाह्य मिळाल्याचं पालकमंत्री डॉक्टर खाडे यांनी नमूद केलं.

****

निसर्ग नियमांवर आधारित आरोग्यदायी जीवनपद्धतीचं मार्गदर्शन करणाऱ्या निसर्गधारा ही मोफत कार्यशाळा आज छत्रपती संभाजीनगर इथं होणार आहे. शहरातील तापडिया नाट्यमंदिर इथं दुपारी पावणेतीन वाजता या कार्यक्रमात

नाशिकच्या योग विद्या गुरुकुलचे योगगुरु डॉक्टर विश्वास मंडलीक निसर्गोपचाराची प्रात्यक्षिकं दाखवणार आहेत.

****

टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज सकाळी झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं स्कॉटलंडवर पाच गडी राखून विजय मिळवला. दरम्यान, काल भारत-कॅनडा संघांदरम्यानचा सामना पावसामुळं रद्द झाल्यानं उभय संघांना प्रत्येकी एक गुण मिळाला आहे.

या स्पर्धेत भारत प्राथमिक साखळी फेरीत अ गटातून अव्वल स्थान मिळवत सुपर एट फेरीत गट एक मध्ये दाखल झाला आहे. भारतासह ऑस्ट्रेलिया,अफगाणिस्ताननं आपलं स्थान पक्क केलं आहे. दरम्यान, या गटातील चौथ्या स्थानासाठी बांग्लादेश आणि नेदरलँड यांच्यात चुरस आहे. सुपर एटच्या गट दोन मध्ये अमेरीका, दक्षिण अफ्रिका, वेस्ट इंडिजनं आणि इग्लंड संघांनं आपलं स्थान पक्क केलं आहे. सुपर एट फेरीत भारताचे २०, २२ आणि २४ जून रोजी सामने होणार आहेत.

****

मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात आज पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. दरम्यान, कोकणात बऱ्याच ठिकाणी वीजांसह पावसाची शक्यता आहे, येत्या तीन ते चार तासांत कोल्हापूरसह सिंधुदुर्ग जिल्ह्यात हलक्या स्वरुपाचा पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. यादरम्यान, कोल्हापूर जिल्ह्यात ३० ते ४० किलोमीटर वेगानं वादळी वारे वाहण्याचा अंदाजही पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे

****

पंजाब, हरयाणा, झारखंड, बिहार, उत्तर प्रदेश या राज्यासह दिल्लीत उष्णतेची लाट कायम राहणार आहे. पश्चिम बंगाल आणि ओडिशातही अशीच स्थिती आहे. याभागात सध्या रात्रीच्या वाढत्या तापमानाचा दैनंदिन जीवनावर परिणाम होत असून, गेल्या दहा वर्षांच्या तुलनेत यंदा उष्ण दिवसांचं प्रमाण जास्त आहे, असं हवामान विभागाचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ आर. के जेनामनी यांनी आकाशवाणीला सांगितलं आहे.

****